# नाविन्यपूर्ण उपक्रम

# आरोग्य विभाग

# जिल्हा परिषद उस्मानाबाद

## ➢ मातृत्व संवर्धन दिन :-

मातृत्व संर्वधन दिन हा प्रत्येक महिन्याच्या २२ तारखेस साजरा करण्यात येतो

ऊद्देश :-

१. प्राथमिक आरोग्य केंद्राची व उपकेंद्राचे जनमानसातील प्रतिमा उंचावणे .

२. प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रामध्ये होणाऱ्या प्रसूतीच्या संख्येत वाढ करणे .

३. माता मृत्यू व अर्भक मृत्यूचे प्रमाण कमी करणे.

४. माता - आरोग्याच्या सर्वंकष सेवेचा लाभ सर्व गरोदर महिलांना देण्याचा प्रयत्न करणे.

मातृत्व संवर्धन दिन अंतर्गत घेण्यात येणारे उपक्रम :-

१. मातृत्व संवर्धन दिनाचे प्राथमिक आरोग्य केंद्र ठिकाणी आयोजन.

२. मातृत्व संवर्धन दिनासाठी कार्यक्षेत्रातील सर्व गर्भवती महिलांना आमंत्रित करणे.

३. मातृत्व संवर्धन दीना वैद्यकीय अधिकारी यांच्यामार्फत गरोदर मतांची तपासणी व उपचार

४. अति जोखमीच्या मातांसाठी संदर्भ सेवेमधून स्त्री रोग तज्ञाची सेवा उपलब्ध करून देणे.

५. मातृत्व संवर्धन दिनाच्या वेळी आरोग्य विषयक मार्गदर्शन (उदा. आहाराविषयी )

६. मातृत्व संवर्धन दिनाचे दिवशी गरोदर पानामध्ये घ्यावयाच्या काळजी बाबत स्लाईड शो दाखवणे .

७. गर्भवती महिलांना आहार विषयक माहिती देणे (चौरस अहाराबाबत ).

८. हळदी - कुंकू, सासू-सून मेळावा, नवदाम्पत्य मेळावा, डोहाळेजेवण या सारखे पारंपरिक कार्यक्रम घेऊन सहभाग वाढविणे.

## ➢ प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान -

जिल्हयामध्ये प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान हा कार्यक्रम चालू आहे. प्रत्येक मातेची गरोदरपणा पासून प्रसूती पर्यंतच्या कालावधीमध्ये योग्य प्रकारे आरोग्य विषयक व आहार विषयक काळजी घेतली जावी तसेच सर्व तपासण्या केल्या जाव्यात व प्रत्येक मातेला आनंदी व प्रसन्न वातावरणाचा अनुभव घेता यावा, यासाठी आरोग्य तपासणी दिन हा एक सोहळा अशा स्वरूपात आयोजित केला जावा अशी या मागे संकल्पना आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर सुरक्षित मातृत्व हे आरोग्य सुधारण्याचे व माता मृत्यू कमी करण्याचे एक प्रभावी साधन असल्याचे आढळून आले आहे. त्या अनुषंगाने केंद्र शासनाने प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान हे दर महिन्याला एका ठराविक दिवशी उस्मानाबाद जिल्हयामध्ये राबविण्यात येत आहे.

अभियानाचे उद्दिष्ट :- प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान चे मुख्य उद्दिष्ट हे गरोदर पानातील दुसर्या व तिसर्या टप्प्यातील सर्व मातांना उच्च दर्जाच्या प्रसुतीपूर्व सेवा, तपासण्या व समुपदेशन करणे हे आहे.